॥ मातृभूमीप्रत ॥

भा. रा. तांबे १९१०

जन्मा येउनिया कुशीं तव; तुझ्या स्कंधीं उरीं वाढुनी
प्रेमाचा नच गोड शब्द वदलों केव्हां तुला आजुनी,
नाही एक विचारही अजुनिया त्वत्सेवनीं योजिला;
ऐशाला म्हणशील काय मजला तूं सांग गे आपुला ? ॥ १ ॥

जे त्वत्पुत्र उदारधी झिझविती काया तुझ्या सेवनीं;
जाळाया निजपोट ही शिणविली वाणी तया निंदुनी;
व्हावा तोष धन्यास यास्तव सदा मी हांसलों त्यांजला,
आतां तूं कुरवाळशील वद का ऐशा कुपुत्रा मला ? ॥ २ ॥

' खोटी ही दुबळी, गुलाम, भरला वृद्धापकाळीं चळ,'
ऐसा दोष दिला तुला वश परां होवोनिया केवळ;
आतां हें स्मरतां मना हळहळे तें; गे गळा दाटला—
डोळे तूं पुसशील काय पदरें घेवोनो अंकीं मला? ॥ ३ ॥

जें त्वां जीवन हें दिलें, सकळ ही सत्ता तुझी ज्यावरी
जातां तें परसेवनीं न तिळही संकोचलों अंतरीं;
धिग्धिग् जीवन हें! असें मन अतां धिक्कारितें गे मला,
त्यातें तूं धरिशील काय हृदयीं पान्हा फुटोनी तुला? ॥ ४ ॥

आहाहा! सुत ते असिव्रत जई त्वत्सेवनीं पाळितां
धैर्याचे गिरि ते कधी न डगले आकाशही फाटतां,
नेतां त्यास दिगंतरास फुटला आई , उमाळा तुला—
डोळे तूं पुसशील का निज, यमें नर्कास नेतां मला? ॥ ५ ॥